|| ग्रामपंचायत हाच ग्रामविकासाचा मुलभूत पाया आहे ||



# ग्रामपंचायत वडगांव घेनंद

ता.खेड,जि.पुणे ४१०५०१

सौ.ललिता दिलिप नितनवरे (सरपंच)

श्री.मारूती परशुराम बवले (उपसरपंच)

जावक क्रमांक :

दिनांक : २४ / १ /२०१९

ग्रामपंचायत वडगांव घेनंद जा.क्र. ४० दि.२४/१/१९ ता-खेड, जिल्हा-पुणे

मा. सरपंच,

ग्रामपंचायत वडगाव घेनंद,

ता. खेड. जि. पुणे,

यांच्याकडून दाखला देण्यात येतो कि मराठवाडा मित्र मंडळ इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी , लोहगाव पुणे व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने ७ दिवसीय विशेष शिबीर हे राष्ट्रीय सेवा योजनेच्या अंतर्गत वडगाव घेनंद येथे दि. **१६/०१/२०१९ ते २२/०१/२०१९** घेण्यात आले.

शिबिराच्या स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत वडगाव घेनंद या गावाच्या विविध ठिकाणी स्वच्छता करण्यात आली व त्यासोबत ग्रामस्थांना स्वच्छतेचा महत्व पटवून दिले. मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या जीवनशैली व चरित्र वर आणि योग व ध्यान चे विशेष महत्व पटवून दिले गेले व व्याख्यान आयोजित करण्यात आले.

शिबिरा अंतर्गत लहान मुलांचे खेळ, महिलांचे खेळ, होम मिनिस्टर इत्यादी व त्यासोबत लहान मुलांचे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले. दि. १९/०१/२०१९ रोजी मराठवाडा मित्र मंडळाच्या सुवर्ण महोत्सव च्या अंतर्गत वडगाव घेनंद येथील जि. प. प्राथमिक शाळा व ग्रामस्थ यांच्या निवासस्थानी ५० झाडे लावण्यात आली व त्यासोबत झाडे लावा झाडे जगवा असा नारा देण्यात आला.

भीमा नदीच्या काठाशी पाणी आडवा आणि पाणी जिरवा या उपक्रमा अंतर्गत बंधारा बांधण्यात आला.

शिबिराचे निरोप हे स्वच्छ भारत अभियान व अंधश्रद्धा निर्मुलन पथनाट्यादवारे करण्यात आले. शिबिराच्या कामाचा स्वरूप पाहून ग्रामपंचायत वडगाव घेनंद यांच्याकडून संत ज्ञानेश्वर यांची प्रतिकृती मराठवाडा मित्र मंडळ इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, लोहगाव पुणे यांच्या राष्ट्रीय सेवा योजना एकक ला सप्रेम भेट देण्यात आले.

आशा प्रकारे ७ दिवसीय शिबिर हे अत्यंत उत्कृष्ट रित्या पार पाडले.सदर मागणी वरून दाखला देण्यात आला.

सरपंच

ग्रामपंचायत वडगांव घेनंद

ता. खेड जि. पुणे